

पुणे जिल्हा शिक्षण मंडळ

मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौड रोड,पुणे-३८

स्पर्धा परीक्षा समिती अहवाल

शैक्षणिक वर्ष:-2023-24

15/09/2023 स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात शुक्रवार दिनांक 15 सप्टेंबर 2023 रोजी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन प्रसिद्ध निवेदक दीपकराज धर्माजी म्हस्के यांच्या शुभहस्ते झाले उद्घाटन प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेतून आपले उज्वल भविष्य साकारले जाऊ शकते त्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यासाची आवश्यकता आहे याविषयी मार्गदर्शन केले दिवांकुर बहुउद्देशीय सामाजिक सेवा संस्थेचे संस्थापक लक्ष्मण म्हस्के व अध्यक्ष अर्चना म्हस्के यांच्या प्रयत्नातून प्रसिद्ध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक श्री सत्यवान यशवंत रेडकर यांचे बहुमूल्य मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले.

श्री सत्यवान रेडकर कनिष्ठ अनुवाद अधिकारी व सीमा शुल्क अधिकारी भारत सरकार यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे महत्त्व, स्पर्धा परीक्षेतील संधी, स्पर्धा परीक्षांचा अभ्यास कसा करावा यासंबंधी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गंगाधर सातव यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा तयारीसाठी आवश्यक असणारी पुस्तके उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रा मार्फत विविध तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित करण्याविषयी लवकरच नियोजन केले जाईल याची ग्वाही दिली.

संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन विद्यार्थी कल्याण मंडळाचे अधिकारी डॉ.आदिनाथ पाठक आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या प्रमुख डॉ. रूपाली शेंडकर यांनी केले महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ सुनिता डाकले, डॉ मेघना भोसले, प्रा लक्ष्मण उकिर्डे, प्रा संतोष मोरे, डॉ स्वाती शिंदे, प्रा तानाजी जाधव, प्रा. विद्या किरवे आणि इतर सहकारी प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाचे

सूत्रसंचालन प्रा कीर्ती करंजावणे यांनी केले महाविद्यालयाची विद्यार्थिनी कोमल लोणारे तिने आभार प्रदर्शन केले.

**प्रसिद्ध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक श्री सत्यवान यशवंत रेडकर यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सातव जी. पी.**




**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक श्री सत्यवान यशवंत रेडकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सातव जी. पी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



महाविद्यालयातील सहभागी विद्यार्थी



14/09/2023 "भाषा क्षेत्रातील आधुनिक रोजगाराच्या संधी"

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात गुरुवार दिनांक 14 सप्टेंबर रोजी हिंदी विभाग आणि स्पर्धा परीक्षा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर गायडन्स वर आधारित "भाषा क्षेत्रातील आधुनिक रोजगाराच्या संधी" या विषयावर डॉ. ओमप्रकाश शर्मा यांचे  व्याख्यान आयोजित करण्यात आले.

स्थानिक प्रादेशिक जागतिक भाषांचे ज्ञान  आधुनिक काळात किमान 22 क्षेत्रामध्ये रोजगाराच्या खूप चांगल्या संधी उपलब्ध आहेत याचे उदाहरणासह दाखले सन्माननीय वक्ते डॉ. ओमप्रकाश शर्मा यांनी दिले आपल्या व्याख्यानात त्यांनी लेखक, सूत्रसंचालक, संशोधक, अनुवादक, वृत्तांत वाचक, दुभाषाकार अशा महत्त्वाच्या क्षेत्रात असणाऱ्या सर्व रोजगारांच्या संधी आपल्या आत्मपरीक्षणाने मिळवू शकतो  या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ दशरथ वाघ यांनी विद्यार्थ्यांना इंग्रजी बरोबरच स्थानिक भाषांमध्ये तसेच मातृभाषेमध्ये ही प्रभुत्व मिळवल्यास अनेक रोजगारांच्या संधी उपलब्ध होऊ  शकतात याचे दाखले दिले.

या संपूर्ण कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गंगाधर सातव यांनी बहुमूल्य मार्गदर्शन  करताना येण्यासाठी सातत्यपूर्ण अध्ययन चिंतन आणि मनन करण्यावर भर देण्याची आवश्यकता आहे असे स्पष्ट केले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन हिंदी विभाग प्रमुख प्रा. स्नेहा हिंगमिरे  आणि स्पर्धा परीक्षा केंद्रप्रमुख डॉ. रूपाली शेंडकर यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी संजीवनी राठोड आणि ज्ञानेश्वरी कटारे यांनी केले

महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ मेघना भोसले, डॉ सुनिता डाकले, डॉ प्रकाश हुंबाड,   डॉ श्रीनिवास इपलपल्ली, डॉ शोभा तितर, प्रा संतोष मोरे, डॉ आदिनाथ पाठक, प्रा.लक्ष्मण उकिर्डे, डॉ स्वाती शिंदे, प्रा पुष्पलता यादव आवर्जून उपस्थित होते प्राध्यापिका राधिका इपककायल  यांच्या विश्वप्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

**डॉ. ओमप्रकाश शर्मा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**



**प्राचार्य डॉ. गंगाधर सातव विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**



**आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ दशरथ वाघ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**



11/9/2023 ते 18/9/2023 “विविध क्षेत्रातील रोजगार विषयक संधी' आणि करिअर मार्गदर्शन व्याख्यानमाला”

महाविद्यालयाच्या प्लेसमेंट आणि स्पर्धा परीक्षा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'विविध क्षेत्रातील रोजगार विषयक संधी' आणि करिअर मार्गदर्शन या विषयावर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानमाले अंतर्गत मॅजिक बस फाउंडेशनचे श्री विशाल क्षीरसागर आणि श्री मयूर कटरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जी पी सातव तसेच महाविद्यालयाचे प्रशिक्षण आणि प्लेसमेंट अधिकारी डॉ प्रकाश हुंबड, स्पर्धा परीक्षा केंद्रप्रमुख डॉ. रूपाली शेंडकर आणि त्यांचे सर्व समिती सदस्य देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी एकूण 112 विद्यार्थी उपस्थित होते.

**श्री मयूर कटरे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**




**मॅजिक बस फाउंडेशनच्या माहेश्वरी महिसागर यांच्याबरोबर सामंजस्य करार करण्यात आला**




21/12/2023 "रोजगार विषयक संधी आणि करिअर मार्गदर्शन"

महाविद्यालयाच्या प्लेसमेंट आणि स्पर्धा परीक्षा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने लाइट हाऊस फाउंडेशनच्या मदतीने रोजगार विषयक संधी' आणि करिअर मार्गदर्शन या विषयावर व्याख्यान आयोजित केले. या कार्यक्रमांतर्गत श्रीमती चिन्मया कुलकर्णी आणि श्री गणेश राऊत यांनी विविध प्रकारच्या रोजगार विषयक संधी तसेच आवश्यक कौशल्ये यावर मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एम आर अवघडे तसेच कॉलेजचे प्लेसमेंट ऑफिसर डॉ प्रकाश ई हुंबड, स्पर्धा परीक्षा केंद्रप्रमुख डॉ. रूपाली शेंडकर आणि त्यांचे सर्व कमिटी सदस्य देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी एकूण 117 विद्यार्थी उपस्थित होते.

**डॉ प्रकाश ई हुंबड विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**




**श्रीमती चिन्मया कुलकर्णी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**



22/12/2023 ते 06/01/2024 “करियर ओरिएंटेशन कार्यक्रम”:

महाविद्यालयाच्या प्लेसमेंट आणि स्पर्धा परीक्षा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने लाइट हाऊस फाउंडेशनच्या मदतीने 22/12/2023 ते 06/01/2024 या कालावधीत करियर ओरिएंटेशन कार्यक्रमाचे आयोजन केले आहे .या कार्यक्रमाअंतर्गत श्रीमती चिन्मय कुलकणी आणि श्री गणेश राऊत आणि त्यांच्या टीमने संवाद कौशल्य, मुलाखत तंत्र यावर मार्गदर्शन केले. लेखन पुन्हा सुरू करा, सादरीकरण, पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन, इंग्रजी संवाद, इ. प्रशिक्षणामुळे सर्व सहभागींना त्यांच्या भविष्यातील रोजगार विषयक संधी निवडताना खूप उपयुक्त ठरेल. टेक महिंद्रा फाऊंडेशनच्या मदतीने लाईट हाऊस फाऊंडेशनद्वारे चालवले जाणारे विविध प्रकारचे मोफत अभ्यासक्रम निवडण्यासही या प्रशिक्षणामुळे मदत होईल. या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ शर्मिला चौधरी मॅडम, माजी प्राचार्य डॉ एम आर अवघडे तसेच महाविद्यालयाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी डॉ प्रकाश ई हुंबड स्पर्धा परीक्षा केंद्रप्रमुख डॉ. रूपाली शेंडकर व त्यांचे सर्व समिती सदस्य उपस्थित होते.

**श्री गणेश राऊत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**




05/02/2024: “MPSC आणि UPSC परीक्षेची तयारी”

मामासाहेब मोहोळ कॉलेजच्या स्पर्धा परीक्षा समितीने 5 फेब्रुवारी 2024 रोजी व्यवस्थापन सप्ताहांतर्गत "MPSC आणि UPSC परीक्षेची तयारी" या विषयावर प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री केतनकुमार पाटील (UNIQUE Academy) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले .

डॉ.सुनीता डाकले (H.O.D. वाणिज्य विभाग) यांनी केतनकुमार पाटील यांचा सत्कार केला डॉ. मेघना भोसले (H.O.D. अर्थशास्त्र विभाग) यांनी श्री. चंद्रकांत खराटे यांचा सत्कार केला. डॉ.सुनीता डाकले (H.O.D. वाणिज्य विभाग) यांनी परिचय करून दिला.

या व्याख्यानात श्री केतन कुमार पाटील सर यांनी नागरी सेवा करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पात्रतांबाबत माहिती दिली त्याचबरोबर उत्तम करिअर करण्यासाठी भारतातील विविध विभागांची माहिती तसेच विविध योजनांची माहिती असणे आवश्यक आहे तसेच एमपीएससी यूपीएससी अभ्यास करताना बैठक, संवाद कौशल्य, नेतृत्व नाविन्यपूर्ण योजनांचा अभ्यास आवश्यक असतो. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी एमपीएससी यूपीएससी मध्ये मुलींचे प्रमाण कमी असून त्यामध्ये वाढ होणे गरजेचे आहे तसेच मुलींना यामध्ये जास्तीत जास्त यश मिळू शकते त्यासाठी त्यांनी प्रयत्नशील असणे गरजेचे आहे याबाबत त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेच्या समन्वयक डॉ.रुपाली शेंडकर व डॉ.स्वाती शिंदे होत्या. ही कार्यशाळा FY/SY/TY B.COM साठी आयोजित करण्यात आली होती एकूण 105 विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत भाग घेतला. यावेळी डॉ. मेघना भोसले (H.O.D अर्थशास्त्र विभाग), डॉ. सुनीता डाकले (H.O.D वाणिज्य विभाग), प्रा.संतोष मोरे(H.O.D BCS विभाग), प्रा. तानाजी जाधव (H.O.D बीव्होक विभाग) उपस्थित होते S.Y.B.Com च्या विद्यार्थ्यांनी कार्यशाळेचे सूत्रसंचालन केले तर डॉ. आदिनाथ पाठक यांनी आभार मानले, महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपला सहभाग नोंदवला.

**श्री केतनकुमार पाटील (UNIQUE Academy) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**






**डॉ.सुनीता डाकले (H.O.D. वाणिज्य विभाग) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**






**07/02/2024: "बँकिंग, विमा, रेल्वे आणि कर्मचारी निवड परीक्षेतील करिअरच्या संधी"**

मामासाहेब मोहोळ कॉलेजच्या स्पर्धा परीक्षा समितीने 7 फेब्रुवारी 2024 रोजी व्यवस्थापन सप्ताहांतर्गत "बँकिंग, विमा, रेल्वे आणि कर्मचारी निवड परीक्षेतील करिअर संधी" या विषयावर प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री लोकेश शर्मा (माजी SBI ऑफिसर) यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

डॉ.आदिनाथ पाठक यांनी श्री.लोकेश शर्मा  यांचा सत्कार केला आणि डॉ.मेघना भोसले (एच.ओ.डी. अर्थशास्त्र विभाग) यांनी श्री.व्यंकटेश नायडू यांचा सत्कार केला. प्रा.सोपान गंभीरे यांनी सत्राचा परिचय करून दिला. या व्याख्यानात श्री. लोकेश शर्मा सर यांनी SSC, IBPS या व्यतिरिक्त विविध राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या बँकिंग परीक्षेच्या तयारीची माहिती दिली. त्यांनी बीकॉम आणि एम.कॉम पूर्ण केल्यानंतर करिअरच्या संधींचे मार्गदर्शन केले. प्रश्नोत्तर विभागातही त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

या कार्यशाळेच्या समन्वयक डॉ.रुपाली शेंडकर व डॉ.स्वाती शिंदे होत्या. ही कार्यशाळा FY/SY/TY B.COM साठी आयोजित करण्यात आली होती एकूण 84 विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत भाग घेतला. यावेळी डॉ. मेघना भोसले (एचओडी अर्थशास्त्र विभाग), डॉ. सुनीता डाकळे (एच.ओ.डी. वाणिज्य विभाग), डॉ. आदिनाथ पाठक, प्रा. तानाजी जाधव (एचओडी बीव्होक विभाग), प्रा. सोपान गंभीरे उपस्थित होते. F.Y.B.Com च्या विद्यार्थ्यांनी कार्यशाळेचे सूत्रसंचालन केले आणि आभार मानले. सर्व समिती सदस्यांच्या सहकार्याने आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहभागाने कार्यक्रमाला मोठे यश मिळाले.

## श्री लोकेश शर्मा (माजी SBI ऑफिसर) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना







## प्रा. सोपान गंभीरे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना






08/02/2024: “सहकार क्षेत्रातील करिअरच्या संधी" या विषयावर अतिथी व्याख्यान”

**मामासाहेब मोहोळ महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा समितीने 8 फेब्रुवारी 2024 रोजी व्यवस्थापन सप्ताहांतर्गत "सहकार क्षेत्रातील करिअरच्या संधी" या विषयावर प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. मुकुंद तापकीर (अध्यक्ष पद्मश्री विखेपाटील एसपीपीयू) यांचे व्याख्यान आयोजित केले होते.**

**प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांनी पाहुणे डॉ..मुकुंद तापकीर यांचा सत्कार केला. डॉ.प्रकाश हुंबड यांनी सत्राचा परिचय करून दिला. डॉ.. मुकुंद तापकीर यांनी आपल्या व्याख्यानाची सुरुवात विद्यार्थ्यांना सार्वजनिक क्षेत्राविषयी आणि खाजगी क्षेत्राच्या विरुद्ध असलेल्या धारणांबद्दल विचारून केली. त्यानंतर त्यांनी सार्वजनिक क्षेत्राशी निगडीत अनेक समज व गैरसमज मोडून काढले आणि दोन्ही क्षेत्रांच्या कामकाजाबाबत महत्वपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना दिली .**

**या कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. रुपाली शेंडकर आणि डॉ. स्वाती शिंदे होत्या. ही कार्यशाळा FY/SY/TY B.COM साठी आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत एकूण 103 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. डॉ. मेघना भोसले (HODअर्थशास्त्र विभाग), डॉ. सुनीता डाकळे (HOD वाणिज्य विभाग), डॉ. प्रकाश हुंबड, डॉ. श्रीनिवास इप्पलपल्ली (HOD इंग्रजी विभाग), डॉ. आदिनाथ पाठक, प्रा. तानाजी जाधव (HOD बी. व्होक विभाग) यावेळी उपस्थित होते. T.Y.B.Com च्या विद्यार्थ्यांनी कार्यशाळेचे सूत्रसंचालन केले आणि T.Y.B.Com विद्यार्थी यश मालपोटे यांनी आभार मानले सर्व समिती सदस्यांच्या सहकार्याने आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहभागाने कार्यक्रमाला मोठे यश मिळाले.**

## डॉ. मुकुंद तापकीर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना










24/02/2024 **रोजगार आणि उद्योजकता विषयावरील व्याख्यानाचा अहवाल**

शनिवार दि. २४/२/२०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, **स्पर्धा परीक्षा समिती** यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात रोजगार आणि उद्योजकता या विषया अंतर्गत पदवीनंतर पुढे काय? या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. सजग नागरिक मंचाचे संस्थापक आणि करिअर मार्गदर्शक श्री विवेक वेलणकर यांनी या विषयावर मार्गदर्शन केले.

आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्या कार्यक्रम समन्वयक प्रा. किर्ती करंजावणे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यांनी प्रास्ताविकामध्ये आजीवन अध्ययन व विस्तार विभागाची उद्दिष्टे, रोजगार आणि उद्योजकता हा विषया निवडण्यामागील भूमिका स्पष्ट केली. श्री विवेक वेलणकर यांनी एमबीए प्रवेश परीक्षा, मास कम्युनिकेशन, एलएलबी परीक्षा, तसेच एमएसडब्ल्यू, स्टाफ सिलेक्शन कमिशन, बँकिंग, डिफेन्स यासारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर ब्युटी पार्लर, केटरिंग, फोटोग्राफी, डिजिटल मार्केटिंग या क्षेत्रात देखील व्यवसायाच्या संधी कशा पद्धतीने आहेत आणि संधी कशा स्वतः तयार केल्या पाहिजेत याविषयी मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांनी बुद्धिमत्ता, चौकस दृष्टी आणि मेहनत या जोरावर कोणत्याही क्षेत्रात यश मिळवता येते असे अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. प्रा. स्नेहा हिंगमिरे यांनी सूत्रसंचालन केले आणि आभार प्रा. कुमुदिनी पाटील यांनी व्यक्त केले . या कार्यक्रमाला एकूण ९७ विद्यार्थी उपस्थित होते तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

**सजग नागरिक मंचाचे संस्थापक आणि करिअर मार्गदर्शक श्री विवेक वेलणकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**




Coordinator

Principal